# बालवाडी : अभ्यासक्रम, कायदा वगैरे

लहान मुलांच्या शिक्षणाच्या संदर्भात जेव्हा मुलांच्या अंगाने विचार केला जातो तेव्हा, तीन पायऱ्या संभवतात. पहिली पायरी ही बालकांच्या विविध क्षमतांच्या विकासाची पायरी. दुसरी पायरी आहे ती ह्या विकसीत झालेल्या क्षमतांच्या सहाय्याने, पुढील शिक्षणात लागणारी साधनभूत /मूलभूत कौशल्ये, जसे, गणन, वाचन, लेखन व अभिव्यक्ती करणे इत्यादी,तसेच, ह्या कौशल्यांच्या सहाय्याने, काही व्यावहारिक विषयांची ओळख करून घेणे. याला आपण व्यवहारात प्राथमिक शिक्षणाची पायरी मानतो. यानंतर येणारी तिसरी पायरी ही क्षमता, कौशल्ये व काही विषयांची तोंडओळख, ह्या औपचारिक तयारीच्या सहाय्याने विविध शास्त्रीय विषयांना भिडून त्यांना आत्मसात करण्याची. हा शालेय शिक्षणाचा शेवटचा टप्पा होय.

बालशिक्षणाच्या पहिल्या म्हणजे क्षमताविकासाच्या पायरीचा मान सगळयात मोठा. ही पायरी नीटपणे ओलांडली तर पुढच्या पायरीची कामे सहज-सुकर होतात; असे अनेक प्रयोगातून केव्हाच सिध्द झाले आहे. तसे झाले नाही तर, पुढील पायरीच्या कौशल्य-प्राप्तीत अनेक अडसर उभे राहतात; हेही आपल्या सार्वत्रिक अनुभवाचे आहे. त्यामुळे क्षमतांचा विकास महत्त्वाचा आहे. तो पुढील शिक्षणाचा (आणि जीवनाचाही) पाया आहे.

यामध्ये, मुख्यतः शारीरिक क्षमता, त्यांना जोडून येणाऱ्या बौद्धिक क्षमता, बौद्धिक विकासाला जोडून येणाऱ्या भावनिक क्षमता व सामाजिक संबंधांतून विकास पावणाऱ्या सामाजिक क्षमता आणि या सर्वांना कवेत घेऊन विकसीत होणाऱ्या भाषिक क्षमता येतात. या सर्व क्षमतांच्या विकासाचे जे शिक्षणक्षेत्र ते बालशिक्षणाचाचे क्षेत्र होय. प्रथेनुसार साधारणपणे सहापर्यंतच्या वयाचा समावेश यात केला जातो; मात्र अलीकडे वय वर्षे तीन ते सहा या वयासाठी मुलांना बालशाळांतून पाठविले जात असल्यामुळे ‘ बालशाळेतील किंवा बालवाडीतील बालशिक्षण ’ असा विषय सामान्यतः आपल्यापुढे येतो. बालवाडी व्यतिरिक्त मुलांचे आपापल्या घरी आणि घराजवळच्या परिसरात ‘ सहजशिक्षण ’

होतच असते. परंतु हे शिक्षण पुरेसे आणि पुरेसा क्षमताविकास साधू शकणार नाही, असे मानून जगभर बालशाळांची व्यवस्था आणली गेली आहे.

बालशाळेत होणाऱ्या विविध उपक्रमांमधून मुलांचा क्षमताविकास योग्य तऱ्हेने व वेगाने होत असेल तर त्याला ‘ शास्त्रीय पध्दतीने चाललेली बालवाडी ’ असे म्हणता येईल. याच निकषावर जोखून पाहिल्यास, आज आपल्या आजूबाजूला असलेल्या असंख्य बालशाळा शास्त्रोक्त पध्दतीने चालत नाहीत असेच म्हणावे लागते. त्यातही बहुसंख्य इंग्रजी माध्यमाच्या बालशाळा परकीय भाषेतील लेखन-वाचन-गणन ही पुढील औपचारिक स्तरावरील कौशल्यांची दीक्षा, त्यासाठी लागणाऱ्या या क्षमताविकासाच्या अगोदरच मुलांच्या माथी मारून, मुलांच्या क्षमताविकासाच्या सहज कार्यावर आघात करून बालवयांतील मुलांचे घनघोर नुकसान करतात. इंग्रजी शाळांचे अनुकरण करणाऱ्या मराठी शाळाही हेच करतात. शासकीय स्तरावरून चाललेल्या लाखो अंगणवाडया असेच, शास्त्रीय बालशिक्षणाच्या पूर्णतः अभावामुळे मुलांच्या ऐन क्षमतांना आकार मिळण्याच्या बालवयात, त्यांचे अमाप नुकसान करतात.

त्यामुळे, महाराष्ट्राच्या नव्या सरकार पुढे, एकीकडे इंग्रजी माध्यमाच्या केजी-नर्सरी शाळांना वेसण घालण्याची तर दुसरीकडे, अंगणवाड्यांना बालशिक्षणाने सुदृढ करण्याची अशी दुहेरी आव्हाने घ्यायची आहेत. महाराष्ट्रात शास्त्रीय बालशिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व्हायला हवे असेल तर शासनाने आधी बालशिक्षणाचे सर्वकष धोरणठरविण्याची गरज आहे, त्यानंतर बालवाडी प्रवेशाचा कायदा करणे, अभ्यासक्रम ठरविणे (बालशिक्षणात तथाकथित ‘ अभ्यास ’ नसतो; त्यामुळे ‘अभ्यासक्रम ’ नव्हे तर ‘ शिक्षणक्रम ’ असा शब्दप्रयोग इष्ट ठरतो ! ) इत्यादी गोष्टी येतात. निश्चित धोरण नसताना प्रवेशांविषयीचा कायदा केल्यास काय होते, हे सांगणारा महाराष्ट्रातील बालशिक्षणाचा इतिहास आपल्या हातांशी आहे.

तत्कालीन महाराष्ट्र सरकारने ‘ राज्यस्तरीय बालशिक्षण समिती ’ ची निर्मिती १९९५ साली, रामजोशी यांच्या अध्यक्षते खाली केली. १९९६साली समितीने आपला अहवाल सादर केला. तो शासनाने पूर्णांशाने स्वीकारण्याचे विधानसभेत, मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. समितीच्या अनेक शिफारसींपैकी फक्त एका, म्हणजे प्रवेशाविषयीच्या शिफारसीच्या आधारे सरकारने, १२ एप्रिल

१९९७ ला कायदा केला. शालेयपूर्व शिक्षणासाठी बालकांच्या आणि त्यांच्या पालकांच्या मुलाखतींना बंदी, त्यांवर आधारित देणग्यांना बंदी, प्रवेशासाठी जवळच्या विद्यार्थ्यांना अग्रक्रम आणि कोणत्याही प्रकारच्या पुस्तकांच्या सक्तीला बंदी असे काही या कायद्याचे विशेष होते. मात्र एका पक्षाच्या सरकारने केलेला हा कायदा दुसऱ्या पक्षाच्या सरकारने, अधिकारावर आल्यानंतर ८ऑगस्ट२००० रोजी रद्द केला. हा इतिहास आत्ताच्या सरकारने त्याच्या कारणांसाठी अभ्यासला पाहिजे.

मात्र महाराष्ट्राच्या या कायद्याचे पडसाद १९९७ सालीच दिल्लीच्या न्यायालयात उमटले. तेथील त्यावेळचे नागरी न्यायाधीश श्री. राजेश अगरवाल यांनी दिल्ली प्रशासनाला व मुख्यमंत्र्यांना अशी सूचना केली की, त्यांनी महाराष्टाच्या धर्तीवर, बालशाळांमधून मुलांच्या व त्यांच्या पालकांच्या मुलाखतींना बंदी घालणारा कायदा करावा. यावेळी न्यायमूर्तींनी केलेले भाष्य खूप महत्त्वाचे आहे. त्यांनी म्हटले आहे, “ बालवाडीत प्रवेश करणारी मुले तर कळया असतात फुलण्यासाठी आलेल्या. त्यांचे त्यापूर्वी शिक्षण झालेले नसते तर शिकण्यासाठी म्हणून शाळेत पहिलेच पाऊल टाकत असतात. अशावेळी त्यांना काय येते हे पाहण्यासाठी मुलाखत घेणे अयोग्य आहे. पालकांच्या मुलाखती घेतल्या जातात, त्या काही वेगळयाच हेतूंनी....... अशा शाळांची पालकांशी असलेली वर्तणूक योग्य नाही. मुलांच्या प्रवेशा बाबत या शाळांना असलेल्या स्वातंत्र्यातच अनेक अनेक गोष्टींची मुळे आहेत. कोणत्याही पालकाची मुलाखत घेण्याची गरज नाही. किंबहुना त्यांचे शिक्षण, त्यांची आर्थिक परिस्थिती यांबाबत अगदी प्रवेश अर्जातही विचारणा करण्याचा शाळांना अधिकार नाही......” दिल्लीतील मदन खुराणा सरकारने, त्याकाळी, चार वर्षां खालील मुलांना प्रवेश देण्यासही बंदी घातली होती. (आणि अर्थसंकल्पातील दहा टक्के पैसा शिक्षणासाठी राखून ठेवला होता! ) कर्नाटक सरकारनेही १९९८ सालीच किंडरगार्टन, नर्सरी, मॉटेसरी सारख्या बालशाळांतून, लहान मुलांच्या प्रवेशपूर्व मुलाखतींवर बंदी घालणारा कायदा केला आहे.

वास्तविक पाहता, रामजोशी समितीच्या शिफारसींनुसार कार्यवाही करण्यासाठी, १९९६ सालीच एक आदेशपत्र शासनाने बालशाळांसाठी जारी केले होते. त्यात,

<u>१</u>. बालशाळेत प्रवेश देताना लहानग्यांची किंवा त्यांच्या पालकांची मुलाखत घेण्यास बंदी, <u>२.</u>शाळेच्या परिसरात रहाणाऱ्या मुलांमधून ८० टक्के प्रवेश देण्यात यावेत, <u>३.</u>प्रवेशाबाबतच्या सूचना,

प्रवेश सुरू होण्यापूर्वी शाळेच्या फलकावर ठळकपणे लावणे. ४.कोणत्याही प्रकारची पाठ्यपुस्तके लावण्यावर बंदी आणि५.खाजगी शिक्षणसंस्थांनी आपल्या वर्गांची नोंदणी ( फौजियाखान समितीनुसार सरकारची ‘ मान्यता घेणे ’ नव्हे !) जिल्हास्तरावरील शिक्षणाधिकार्यांकडे करणे; अशाप्रकारचे ह्या आदेशाचे स्वरूप होते. त्याचीच पुनरावृत्ती आजही, नव्या सरकारने लगोलग करणे पुरेसे आहे.

वास्तविक पाहता, आधीच अनेक कामांच्या भाराने वाकलेल्या शिक्षणखात्याकडे, राज्यातील बालशिक्षणाची जबाबदारी देऊन फारसे काही साधेल असे वाटत नाही. उलट, शास्त्रीय बालशिक्षणाचे सार्वत्रिकीकरण योग्य रित्या साधावयाचे असेल तर, रामजोशीसमितीच्या शिफारसीनुसार राज्यात, स्वायत्त स्वरूपाचे, तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली असलेले असे ‘महाराष्ट्र बालशिक्षणमंडळ’ स्थापन करणे इष्ट होणार आहे. राज्यातील बालशिक्षणाचे योग्य नियंत्रण, नियमन, पर्यवेक्षण आणि नियोजन व संशोधन व्हावे यासाठी, शिक्षण खात्याच्या बाहेर, काही खास अधिकार देऊन असे मंडळ कार्यान्वित करणे हे उपयुक्त ठरेल. अलीकडेच (नोव्हेंबर२०१४) साखळी, गोवा येथे, गोमंतक बालशिक्षणपरिषद व महाराष्ट्र बालशिक्षणपरिषद यांचे संयुक्त अधिवेशन साजरे झाले. त्यावेळी, या दोन्ही राज्यांनी असे स्वायत्त बालशिक्षण मंडळ स्थापन करावे असा ठराव संमत करण्यात आला आहे. याची दखल गोमंतकाच्या मुख्यमंत्र्यांनी लगेचच घेऊन अशा मंडळ स्थापनेची तयारीही सुरू केली आहे.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी आणि शिक्षणमंत्र्यांनी असे पाऊल उचलून, बालकांच्या क्षमतांधारित शिक्षणाची पायाभरणी करायला हवी आहे.

❖